# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपिल क्र.५४५/२०२४/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.उदय माणीकलाल हिरावत रा.प्लॉट नं.५, न्यु महावीर हौसिंग सोसायटी, पेठरोड, पंचवटी, नाशिक ता.जि.नाशिक. ४२२ ००३. | उप अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. | कार्यकारी अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक १०/०४/२०२६**

१. **उपस्थिती -**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित |

२. **द्वितीय अपिल अर्ज -**

(१) द्वितीय अपिल अर्जाचा दिनांक : २९/०१/२०२४

(२) द्वितीय अपिल अर्जात नमूद केलेली कारणे : मुदतीत माहिती न दिल्याने व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाचे पालन न केल्याने.

(३) द्वितीय अपिल अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

३. **माहिती अर्ज -**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १९/०७/२०२३

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९/०७/२०२३

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि.०१/०१/२०१७ ते १९/०७/२०१७.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : मौजे म्हसरुळ ता.जि. नाशिक येथील सर्व्हे नं.२२९/२३४/१अ/३०२/३/प्लॉट नं.१, स्नेह नगर, दिंडोरी रोड, नायरा पेट्रोल पंपाशेजारी, अभीषेक प्लाझा या संकुलात आपणामार्फत गाळयांना (दुकानांना) दिलेल्या परवानगीबाबतची कागदपत्रे तसेच अभीषेक प्लाझा व रहीवासी मालकांना आपल्यामार्फत मंगल कार्यालय व बॅक्वेट हॉल तसेच रुम्स, ऑफीसेस ला दिलेल्या परवानगी व परवान्यांच्या तसेच मंगल कार्यालयात हॉल यास सर्व नगरपालिकेला लागणा-या कागदपत्रांची माहिती, परवानगी व परवान्यांच्या नकलांच्या छायांकित प्रती प्रमाणीत मिळाव्यात.

| | | | |
|---|---|---|---|
| (५) | जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक यांनी दि.०७/०८/२०२३ च्या पत्रान्वये याबाबत इकडील कार्यालयाकडे अभीलेख स्वरुपात माहिती उपलब्ध नाही. इकडील कार्यालयाकडील अभीलेख हे परवानगी जावक क्रमांक व दिनांक या स्वरुपात साठविण्यात आले आहेत त्यामुळे आपण सदर बांधकामाचे परवानगी क्रमांक व वर्ष इकडील कार्यालयाकडे कळविल्यास त्या माहितीचा शोध घेवून आपणांस विहीत शुल्क भरुन घेवून उपलब्ध करुन देता येतील असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते. |

४. **प्रथम अपिल —**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्रथम अपिल अर्जाचा दिनांक | : | १८/०९/२०२३ |
| (२) | प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १८/०९/२०२३ |
| (३) | प्रथम अपिल दाखल करण्याचे कारणे | : | विहीत मुदतीत माहिती न दिल्याने. |
| (४) | प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : | अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक यांनी दि.१८/१०/२०२३ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये UDCPR मधील मंगल कार्यालयाच्या तरतुदी व महापौर यांनी आदेशीत केले असल्यास त्याबाबत तपासून कागदपत्रे द्यावे, नसल्यास त्याबाबत कळविणे, तसेच मंगल कार्यालयास परवानगी आहे किंवा नाही त्याबाबत कळवावे असे आदेश पारित केल्याचे दिसून येते. |

५. **युक्तीवाद / लेखी खुलासा —** तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७/०८/२०२३ च्या पत्रान्वये इकडील कार्यालयाकडे अभीलेख स्वरुपात माहिती उपलब्ध नाही. इकडील कार्यालयाकडील अभीलेख हे परवानगी जावक क्रमांक व दिनांक या स्वरुपात साठविण्यात आले आहेत, त्यामुळे आपण सदर बांधकामाचे परवानगी क्रमांक व वर्ष इकडील कार्यालयाकडे कळविल्यास त्या माहितीचा शोध घेवून आपणांस विहीत शुल्क भरुन घेवून उपलब्ध करुन देता येतील असे अपिलार्थीस कळविले आहे. तसेच प्रथम अपिल निर्णयानुसार दि.१३/०२/२०२४ च्या पत्रान्वये इकडील कार्यालयाकडे अभीलेख स्वरुपात माहिती उपलब्ध नाही. तसेच मंगल कार्यालयाच्या परवानगी बाबत आपण सदर बांधकामाचे जावक क्रमांक, वर्ष इकडील कार्यालयास कळविल्यास त्या माहितीचा शोध घेवून आपणांस उपलब्ध करुन देता येईल. सदर माहितीचे अवलोकनासाठी आपण इकडील कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर रहावे. अवलोकनानंतर आपणांस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले आहे.

६. **निष्कर्ष -**

१. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक यांनी दि.०७/०८/२०२३ च्या पत्रान्वये इकडील कार्यालयाकडे अभीलेख स्वरुपात माहिती उपलब्ध नाही. इकडील कार्यालयाकडील अभीलेख हे परवानगी जावक क्रमांक व दिनांक या स्वरुपात साठविण्यात आले आहेत, त्यामुळे आपण सदर बांधकामाचे परवानगी क्रमांक व वर्ष इकडील

कार्यालयाकडे कळविल्यास त्या माहितीचा शोध घेवून आपणांस विहीत शुल्क भरुन घेवून उपलब्ध करुन देता येतील असे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येते.

२. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक यांनी दि.१८/१०/२०२३ रोजी प्रथम अपिलाची सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसून येते.

३. प्रथम अपिल निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक यांनी दि.१३/०२/२०२४ च्या पत्रान्वये इकडील कार्यालयाकडे अभीलेख स्वरुपात माहिती उपलब्ध नाही. तसेच मंगल कार्यालयाच्या परवानगी बाबत आपण सदर बांधकामाचे जावक क्रमांक, वर्ष इकडील कार्यालयास कळविल्यास त्या माहितीचा शोध घेवून आपणांस उपलब्ध करुन देता येईल. सदर माहितीचे अवलोकनासाठी आपण इकडील कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर रहावे. अवलोकनानंतर आपणांस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येते. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती पुरविण्याचे आदेश पारित केलेले असतांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक यांनी तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

४. अपिलार्थी यांना अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थी यांच्या दि.१९/०७/२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागणी केलेली माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत देखील अपिलार्थी यांना स्पष्टपणे कळवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभीयंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालीका, नाशिक (श्री. जयवंत राऊत) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधीनियम २००५ च्या कलम २० नुसार कार्यवाही का करण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी सदरचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहीत मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर याप्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल.

३. वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपिल क्रमांक ५४५/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेंद्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

जावक क्र. ३२९६ दिनांक : 08 MAY 2026